



# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १३० वा ❑ शुक्रवार दि.४ जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## विधिमंडळाच्या कामकाजाचे पालन आवश्यक

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

कायदेमंडळ, ज्याला विधानसभा देखील म्हणतात, हे सरकारचे एक महत्त्वाचे अंग आहे ज्याचे मुख्य कार्य कायदे करणे आहे. याव्यतिरिक्त, कायदेमंडळ सरकारच्या कामकाजावर लक्ष ठेवते, आर्थिक बाबी नियंत्रित करते आणि सार्वजनिक तक्रारी ऐकते.विधिमंडळ सदस्य सरकारच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करू शकतात, मंत्र्यांकडून उत्तरे मागू शकतात आणि सरकारच्या धोरणांवर आणि कृतींवर टीका करू शकतात.शेवटी

विधिमंडळ जनतेला उत्तरदायित्व आहे आणि सार्वजनिक प्रश्न उपस्थित करणे आणि सरकारकडून त्यांचे निराकरण करण्याची मागणी करणे, हे विधिमंडळ सदस्याचे अथवा संस्था सदस्याचे कार्य आहे व परंतु विधिमंडळ सदस्य म्हणून विधिमंडळाच्या कामकाजाचे किंवा संसदीय कामकाजाची नियमांचे पालन करणे हे प्रत्येक सदस्यांचे कर्तव्य आहे.संसद सदस्य असो की विधिमंडळ म्हणून सन्माननीय, शिस्तबद्ध आणि अनुकरणीय वर्तन राखणे आवश्यक आहे.

लोकशाही समाजाच्या सुरळीत कामकाजासाठी संसदीय प्रक्रियेचे पालन करणे आवश्यक आहे. मात्र राज्य विधान मंडळाचे माजी अध्यक्ष नाना पटोले यांची विधिमंडळातील वागणूक संसदीय कामकाजाला विधिमंडळाच्या कामकाजाला अनुसरून नव्हती. नाना पटोले काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष राहिलेले आहेत. राज्य विधिमंडळाचे सभापती राहिलेले आहेत. नाना पाटोळे रिंगटोन मंडळ कामकाजाचे नियम पायदळी तुडविले जाणे अपेक्षित नाही.

राज्य विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी काँग्रेसचे आमदार आणि माजी विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांना एक दिवसासाठी निलंबित करण्यात आलं. सभागृहात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेत त्यांनी अध्यक्षांच्या टेबलजवळ जाऊन जोरदार मागणी केली. या वेळी त्यांनी असंसदीय भाषा वापरल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला.

शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून संपूर्ण सभागृहात प्रचंड गदारोळ निर्माण झाला. विरोधकांनी भाजप आमदार बबनराव लोणीकर आणि कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर कारवाईची जोरदार मागणी करत सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. याच दरम्यान, नाना पटोले यांनी अध्यक्षांच्या टेबलजवळ जाऊन आक्रमक भाषण केलं.राजदंडाला स्पर्श केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकारावर तीव्र आक्षेप घेत, अध्यक्षांचा अपमान केल्याबद्दल नाना पटोले यांनी माफी मागावी, अशी मागणी केली. मात्र कामकाजात सातत्याने अडथळा येत असल्यामुळे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कारवाई करत पटोले यांना एक दिवसासाठी निलंबित केलं.पटोले यांच्या, ''मोदी तुमचे बाप असू शकतील, पण शेतकऱ्यांचे नाही,'' या वादग्रस्त वक्तव्यावरून वातावरण अधिक तापलं. परिणामी, सभागृहाची कारवाई काही वेळासाठी तहकूब करण्यात आली. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये निर्माण झालेल्या तणावामुळे अधिवेशनाचा दुसरा दिवस गोंधळातच गेला.

लालफितीत अडकडलेल्या प्रशासकीय कामकाजाला गती देण्याचे काम विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या माध्यमातून होते. जनतेतून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना सन्मान असला तरी, ज्या जनतेतून तो निवडून येतो, त्याचे प्रश्न, समस्या सरकारच्या माध्यमातून लवकर मार्गी लागाव्यात यासाठी वर्षातून तीन वेळा विधिमंडळाचे अधिवेशन होत असते. विधिमंडळ सचिवालयाकडून वर्षातून तीन अधिवेशने होत राहतील. या अधिवेशनासाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करावी लागते. तो पैसा जनतेच्या करातूनच खर्च केला जातो. त्यामुळे विरोधकांनी विधिमंडळाच्या कामकाजावर भर देत, जो जनतेचा आवाज आहे, तो सभागृहात मांडण्याकडे लक्ष द्यायला हवे. महाराष्ट्र विधानसभेची आजची स्थिती अशी आहे की, विरोधी पक्षाच्या आमदारांकडे पुरेसे आमदार नसल्याने विरोधी पक्ष नेते पदावर कोणाची वर्णी लागलेली नाही. आपले संख्याबळ कमी असताना, जास्तीत जास्त सभागृहात बाजू मांडणे हे लोकशाहीच्या दृष्टीने हिताचे आहे. सभागृहात आमदारांनी मांडलेला मुद्दा हा रेकॉर्डवर घेतला जातो. त्यामुळे एखाद्या आमदाराने अभ्यासपूर्ण केलेले भाषण हा पुढील काळात संदर्भ म्हणून वापरला जाऊ शकतो, याचे भान प्रत्येक आमदारांनी ठेवायला हवे.






# संत ज्ञानेश्वर माऊली व संतश्रेष्ठ सोपान काका महाराजांच्या पालखीची भेट

**ज्योतिर्मय साहित्य**

**सोलापूर** – भेट संतबंधूंची, आभाळ आले भरून, पालखी त्या दोघांची आपल्या मार्ग निघाली.. या काव्यपंक्ती प्रमाणे कैवल्य साम्राज्य संत ज्ञानेश्वर महाराज व संतश्रेष्ठ सोपान काका महाराज या संत बंधूंच्या भेटीचा हृदय सोहळा गुरुवारी (दि. ३) दसूर (ता. माळशिरस) जवळ झाला. तोंडले येथील विसाव्यानंतर वारकऱ्यांना संत बंधूंच्या भेटीच्या सोहळ्याची आस लागली होती. भेटी सोहळ्याच्या दरम्यान आकाश ढगांची दाटी झाली, मधूनच पडणाऱ्या पावसाच्या सरी अशा प्रसन्न वातावरणात बंधू भेटीचा हृदय सोहळा पाहताना भाविकांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.




संत सोपानकाका महाराजांचा पालखी सोहळा बंधू ज्ञानदेवाच्या भेटीसाठी दसूर पाटीजवळ रस्त्याच्या उजवीकडील बाजूस ज्येष्ठ बंधू ज्ञानदादाची वाट पहात थांबला होता. त्या सोहळ्यातील वारकऱ्यांनी फुगड्या अन् भारुडांचे सादरीकरण करीत वारकऱ्यांना मंत्रमुग्ध केले. याच दरम्यान अचानक पावसाला सुरवात झाली अन् सोहळ्यातील भाविक चिंब न्हाऊन निघाले. दुपारी पावणेचार वाजता माऊलींचा पालखी सोहळा बंधू भेटीसाठी दाखल झाला. माऊलीचा रस्त्याच्या डाव्या बाजूला येऊन थांबल्यामुळे सोपानकाकांचा सोहळा माऊलीच्या बाजूला गेला.

दोन्ही संतबंधूंचा रथ एकमेकांच्या जवळ येताच, भाविकांनी 'निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम...' असा संतांच्या नावाचा जयघोष करीत टाळ्यांचा कडकडाट केला. यावेळी स्थानिक गावकऱ्यांनी जेसीबीतून फुलांची उधळण करीत बंधूभेटीच्या सोहळ्याचा उत्साह अधिक वाढविला.

सुरवातीला संत सोपान काकांच्या सोहळ्यातील अश्वांनी माऊलींच्या पादुकांचे दर्शन घेतले. त्यानंतर संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे प्रमुख योगी निरंजनदास, डॉ. भावार्थ देखणे, राजाभाऊ चोपदार यांनी संत सोपानकाका सोहळ्याचे प्रमुख ॲड. त्रिगुण गोसावी यांना मानाचा श्रीफळ दिला. त्यानंतर दोन्ही सोहळ्यातील मानकऱ्यांनी एकमेकांना श्रीफळ देत सस्नेह भेट घेतली. बंधू भेटीचा क्षण पाहण्यासाठी वारकऱ्यांनी गर्दी केली. भेटीनंतर संत सोपान काकांचा सोहळा भंडीशेगावकडे मुक्कामी गेला. तर, माऊलींचा ही सोहळा याच मार्गाने पुढे गेला. सावळ्या विठूरायाच्या दर्शनासाठी माऊलींचा पालखी सोहळा आळंदी येथून प्रस्थान ठेवल्यानंतर तो सासवड येथे मुक्कामी असतो. त्याच दिवशी सासवड येथून संतश्रेष्ठ सोपान काका महाराजांचा पालखी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान ठेवतो. अठरा दिवसांच्या प्रवासानंतर सोहळा सोपानकाकांचा सोहळा पंढरीत दाखल होतो. माऊलींचा सोहळा सासवड मुक्कामी असतो, त्याच दिवशी बंधू सोपानकाकांचा सोहळा पांढरीकडे प्रस्थान ठेवतो. त्या बंधूंची भेट पंढरपूर तालुक्याच्या उंबरठ्यावर होते. संत सोपानकाकांच्या महाराजांच्या पालखी रथास दररोज फुलांची आकर्षक सजावट करण्यात येते. बंधू भेटीचा सोहळा असल्याने पालखी रथाच्या दर्शनी भागात फुलांद्वारे 'बंधूभेट' असे आकर्षक पद्धतीने लिहिले होते.

# शिक्षणाबरोबर शाळेत मुलांवर संस्काराची गरज- प्रदीप नाईक

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – केशव माधव विश्वस्त निधी या संस्थेतर्फे कर्वेनगर परिसरातील अभिजात माध्यमिक शाळा, ज्ञानदा प्रशाला आणि सरस्वती विद्या मंदिर या शाळेतील इयत्ता दहावीमध्ये प्रथम आणि द्वितीय आलेल्या गुणवंत विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचा, पालकांचा व वर्गशिक्षकांचा गुणगौरव सोहळा अभिजात माध्यमिक शाळा सोमवार दिनांक ३० जून रोजी संपन्न झाला.याप्रसंगी मएसोचे उपाध्यक्ष, कर्वे संस्था, वडगाव शेरी येथील व्हिजन स्कूलचे संस्थापक संचालक प्रदीप नाईक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रदीप नाईक यांनी'' राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या आयुष्यातील काही दाखले देत प्रत्येक विद्यार्थांनी यशाची शिखरे गाठत असताना माणूस म्हणून जगलं पाहिजे'' तसेच कागदावरील गुणवत्ता खूप चांगली वाटते पण प्रत्यक्ष जीवनात यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रमाची आवश्यकता असते.विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करावे व उत्तुंग यश मिळवावे ''असा मौलिक सल्ला या वेळी विद्यार्थांना दिला.प्रदीप नाईक लिखित पाच पुस्तके तिन्ही शाळांना वाचनालयामध्ये सर्वांना वाचण्यासाठी भेट म्हणून दिली. याप्रसंगी अभिजात एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा अमला भागवत, सचिव सुप्रिया पालकर, मुख्याध्यापिका पूर्वा म्हाळगी, शैक्षणिक सल्लागार सुनील वाटवे,केशव माधव विश्वस्त निधीचे अध्यक्ष सदानंद भागवत, सचिव अरविंद देशपांडे, कविता शेंडे, त्याचबरोबर ज्ञानदा शाळेचे अध्यक्ष व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कर्वेनगरचे संघचालक उदयन पाठक, सचिव मनोज शेंडे,सरस्वती विद्यामंदिर शाळेचे अध्यक्ष राजेश भांडारकर, सचिव संध्या डबीर आदींची उपस्थिती होती.यावेळी पुढील विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्रक, १००१ रुपये रोख रक्कम, ''जिद्दीची लोभस रूप'' हे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.

अभिजात माध्यमिक शाळा – कु.समृद्धी सोलापुरे ९३.८०% कु. परमेश्वरी निकम –९२%श्रेयस कदम –९०.६०%विराज मालपोटे ८८.४०% सरस्वती विद्या मंदिर – कु.तनुजा कांबळे ९०.८०% कीर्ती निंबाळे – ८५%सक्षम खरात – ९१.४०% तुषार कड – ८९.८०% अँड.डी.आर नगरकर(ज्ञानदा) प्रशाला – अनिकेत कोळी – ८१.४०% अथर्व चव्हाण–७९.४०% कु.ऋतुजा पवार–८४.४०% कु.प्रियांका वाव्हुळे–८१% तीनही शाळांच्या मुख्याध्यापक आणि १० वी वर्गशिक्षक यांचाही १००१ रुपये देऊन सत्कार करण्यात आला.

१.अभिजात माध्यमिक शाळा वर्गशिक्षकप्रमोद उमाप मुख्याध्यापिकापूर्वा म्हाळगी. २. सरस्वती विद्यामंदिर वर्गशिक्षकअर्चना




शेडगे मुख्याध्यापक किरण कोल्हे ३. ॲड.डी.आर.नगरकर (ज्ञानदा) प्रशाला वर्गशिक्षक वैशाली साळुंके मुख्याध्यापिका स्वाती कुलकर्णी.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी कुलकर्णी यांनी केले.

आभार श्रद्धा पैठणकर यांनी मानले. सरस्वती वंदनेच्या वेळी अनिलखाडिलकर यांच्या शंख वादनाने प्रसन्न वातावरण निर्माण झाले होते. सामूहिक पसायदान होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.कार्यक्रमास ज्ञानदा,पालकर,सरस्वती विद्यामंदिरचे कर्वेनगर मधील शिक्षक,पालक,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नन्हे फरिश्ते मुळे फुलले हास्य

घरात भांडण होणे, गर्दीत हरवणे, पुण्या – मुंबईसारख्या मोठ्या शहराचे आकर्षण या आणि अशा अनेक कारणांमुळे राज्यातील अनेक मुले पुण्या – मुंबई सारख्या मोठ्या शहरात दाखल होतात. कुटुंबाशी ताटातूट झालेली ही मुलं पुण्या – मुंबईतील रस्त्यांवर, फुटपाथवर, रेल्वे स्टेशनवर, बस स्टॉपवर भटकत असतात. भीक मागून पोटाची खळगी भागवत असतात. यातील काही मुले वाम मार्गाला लागतात तर काही मुले असेच अनाथ म्हणून भटकत असतात. तर काही मुलांना गुंड मवाली जबरदस्तीने भीक मागायला लावतात. त्या मुलांचा गुंड मवाली अतोनात छळ करत असतात. या मुलांना पुन्हा स्वगृही पाठवण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने (आर पी एफ) नन्हे फरिश्ते ही मोहीम राबवली. या मोहिमे अंतर्गत एप्रिल आणि मे या दोन महिन्यांच्या कालावधीत मध्य रेल्वेच्या पाचही विभागातील वेगवेगळ्या स्थानकांत रेल्वे संरक्षण दलाच्या विशेष पथकाने ( आरपीएफ) २३५ मुलांचा शोध घेऊन या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले. ही सर्व मुले १२ ते १५ वयोगटातील आहेत. एकट्या पुणे स्थानकात एप्रिल आणि मे या दोन महिन्यात ५१ मुलांचा शोध घेऊन रेल्वे सुरक्षा दलाच्या विशेष पथकाने ( आरपीएफ ) या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले. विशेष म्हणजे शोधलेल्या या मुलांमध्ये पोलीस ठाण्यात नोंद नसलेलीही काही मुले आहेत. ऑपरेशन नन्हे फरिश्ते ही मोहीम रेल्वे सुरक्षा दलाकडून मागील सात वर्षांपासून राबवण्यात येत आहे. २०१८ मध्ये ऑपरेशन नन्हे फरिश्ते या मोहिमेची सुरुवात झाली. आपल्या आई वडिलांपासून ताटातूट झालेली, घरातून निघून पुण्या – मुंबई सारख्या मोठ्या शहरात पळून आलेली, हरवलेल्या अल्पवयीन मुला मुलींना पुन्हा आपले आई वडील मिळावेत, त्यांना त्यांचे घर पुन्हा मिळावे यासाठी ही मोहीम राबवली जाते. मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा दल, रेल्वे पोलीस, रेल्वे कर्मचारी यांच्या समन्वयातून ऑपरेशन नन्हे फरिश्ते ही मोहीम राबवली जाते. या मोहिमे अंतर्गत रेल्वे सुरक्षा दलाने रेल्वे डब्यात, रेल्वे स्थानकात किंवा रेल्वेच्या हद्दीत हरवलेल्या किंवा पुण्या – मुंबईत पळून आलेल्या हजारो मुलांची सुटका केली. या मोहिमेमुळे हजारो अल्पवयीन मुलांच्या व त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले असून आई वडिलांकडून, कुटुंबापासून दुरावलेली हजारो मुले आपल्या आई वडिलांच्या कुशीत सामावली आहेत. ही मोहीम राबवण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने विशेष आराखडा तयार केला. रेल्वेच्या हद्दीत ज्या ठिकाणी अल्पवयीन मुले मुली भीक मागत आहेत अशी ठिकाणे पोलिसांनी शोधून काढली. या ठिकाणी पोलिसांनी अतिशय गुप्तपणे कारवाई केली. या मुलांना भीक मागायला लावणाऱ्या रॅकेटचा शोध घेतला आणि त्यांना अटक करून हजारो मुलांची सुटका केली. मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेऊन या मुलांचे प्रबोधन करण्यात आले. या मुलांच्या पालकांचा शोध घेऊन या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्याचे मोठे आव्हान रेल्वे सुरक्षा दलाच्या पोलिसांसमोर होते. ते आव्हान पोलिसांनी लीलिया पेलले आहे. ही मोहीम अतिशय स्तुत्य आणि अनुकरणीय अशी आहे. ही मोहीम राबवणाऱ्या रेल्वे सुरक्षा दलाचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे. रेल्वे सुरक्षा दलाने ही मोहीम राबवून हजारो मुलामुलींना अनाथ होण्यापासून आणि वाम मार्गाला लागण्यापासून वाचवले आहे. ही मोहीम राबवणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना मनापासून धन्यवाद द्यावे लागेल. मुंबई पोलीस दलातर्फे देखील ऑपरेशन मुस्कान नावाची अशीच एक मोहीम राबविण्यात येते. या मोहीमे अंतर्गत देखील हजारो मुलामुलींना त्यांच्या पालकांकडे, कुटुंबाकडे सुपूर्त करण्यात आले आहे. ऑपरेशन नन्हे फरिश्ते, ऑपरेशन मुस्कान या सारख्या मोहिमा फक्त पुण्या – मुंबई पुरत्याच मर्यादित न राहता सर्व महानगरात राबवायला हव्यात म्हणजे बेघर झालेली लाखो मुले स्वगृही परततील आणि स्वगृही परतणाऱ्या या मुलांच्या आणि पालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलेल.



**श्याम ठाणेदार**
**पुणे**




## जात्यावरच्या ओव्या......

सांगून धाडते
माझ्या सांगलीचा लाड
अंगणात फुलझाड
तशी चोळी मला धाड ॥१५२॥

चाल चाल बहिणी !!
किती चालू रे बंधवा?
तुझ्या छत्रीला गोंडे
माझ्या चोळीला चांदवा ॥१५३॥

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## अंधारापलीकडील प्रकाश हेलन केलर यांची प्रेरणादायी गाथा





विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

तिला परिपूर्णतेचा ध्यास होता. त्यासाठी तिने मनापासून प्रयत्न केले. ती म्हणते, 'आपण स्वतःच्या अपेक्षा वाढवल्या की, त्या पूर्ण करण्याची वृत्ती आपोआप आपल्यात निर्माण होते.'

हेलनने शिक्षणाची वाटमध्ये गाठली ही पदवी मिळवणारी पहिली अंध-मूकबधिर महिला ठरली. तिचं आत्मचरित्र द स्टोरी ऑफ माय लाईफ आजही प्रेरणादायी ठरतं.

ती म्हणते "आपण स्वतःच्या अपेक्षा वाढवल्या की त्या पूर्ण करण्याची वृत्ती आपोआप निर्माण होते." हे तिच्या संपूर्ण जीवनाला लागू पडतं. तिच्या आत्मचरित्रात ती केवळ स्वतःच्या यशाची कहाणी सांगत नाही, तर ती जगण्याची नवी भाषा शिकवतेस्पर्शांची, प्रयत्नांची आणि सकारात्मकतेची.



हेलन केलर केवळ स्वतःपुरती मर्यादित राहिली नाही. तिनं अपंगांच्या, महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांसाठी लढा दिला. ती सोसिऍलिस्ट पार्टी ऑफ अमेरिका मध्ये सहभागी झाली, या संस्थेची संस्थापक सदस्य होती. जगभर ४० पेक्षा अधिक देशांत प्रवास करत तिनं अंध व अपंगांच्या सक्षमीकरणासाठी काम केलं. तिच्या या प्रवासात एकदा भारतात सुद्धा ती येऊन गेली.

हेलनने अनेक प्रभावी भाषणं दिली. त्यापैकी काही आजही ऐकताना अंगावर शहारे आणतात:

स्ट्राइक अगिंस्ट वार" (१९१६):

"शस्त्रांनी शांतता येत नाही, ती येते माणसाच्या मनातून."

युद्धविरोधी विचार मांडणाऱ्या या भाषणात तिनं शांततेचा खरा अर्थ सांगितला.

लायन्स क्लब ऍड्रेस (१९२५):

"अलोन वूई कॅन डू सो लाईट; टूगेदर वई कॅन डू सो मच."

सहकार्याचे सामर्थ्य या एका वाक्यात तिनं मांडलं.

ऑप्टिमिझम (१९०३):

"Though the world is full of suffering, it is also full of the overcoming of it."

दुःख हे अपरिहार्य आहे, पण त्यावर मात करता येतेहा तिचा जीवनसिद्ध अनुभव होता.

हेलन केलर आपल्याला काय सांगते?

ती आपल्याला शिकवते

शरीराला मर्यादा असतात, पण मनाला नाही.

जगण्याची भाषा शब्दांनी नव्हे, तर कृतीने लिहिली जाते.


प्रत्येक अंधारात स्पर्शांचा उजेड दडलेला असतो.

आपण बोलतो, पाहतो, ऐकतोतरीही थांबतो. पण हेलन? ती मात्र अंधारातूनही पुढे चालत राहिली. कारण तिला माहिती होतं"ध्येय नसेल तर दृष्टी असूनही माणूस अंध असतो."

तिला अनेक देशांच्या राष्ट्रपतींनी गौरवलं, जगभरातील अनेक प्रसिद्ध व्यक्तींची तिची मैत्री होती. या प्रसिद्ध व्यक्ती तिच्याशी मैत्री असणं म्हणजे आपला सन्मान मानत. १९६४ मध्ये अमेरिकेचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रेसिडेशीअल मेडल ऑफ फ्रीडम तिला मिळाला. १९६८ मध्ये तिचं निधन झालं, पण तिचं जीवन आजही प्रेरणेचं शिखर आहे.

ही कहाणी केवळ तिची नाही, आपलीही आहे

हेलन केलरचं जीवन केवळ अपंगत्वावर मात करणं नाही, तर ते संपूर्ण मानवजातीसाठी उमेद आणि आशेचा संदेश आहे. आपल्याला वाटतं, "हे शक्य नाही," पण तिचं उत्तर असतं"शक्य आहे, जर इच्छा असेल तर!"



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## सख्यभक्ति

ज्योतिर्मय साहित्य


वेद,ऊपनिषदे, ब्रम्ह, ब्रम्हज्ञान मन, वाणी यांच्या कक्षे पलीकडे परमप्रेम सुद्धा अनिर्वचनीय आहे. प्रेमाचे सत्य सुक्ष्म, सरळ, रसमय, सुंदर वर्णन वाचून मन भरून जाते.

भक्ति कशी यासाठी पांडवांचे ऊदा दिले आहे. लाक्षाग्रहात जाळून मारायला आलेल्या कौरवांचा हेतू भगवंताने सफल होऊ दिला नाही त्याने पांडवांना भुयाराच्या वाटेने बाहेर काढले. म्हणून शुद्ध मनाने त्याच्यावर प्रेम करावे.

आपण बाराव्या समासा पर्यन्त आलो होतो. प्राणप्रिय हे विशेषण लावताना ,प्राणासारखा,प्राणाइतका,प्राणापेक्षा जास्त असे विशेषण लावतो. भगवंतावर असं प्रेम करावे की आपल्या हृदयात प्राण आहे का भगवंत आहे हे कळेनासे होते. वेदांतील ब्रम्ह जसे मन,वाणी यांच्या पलीकडे असते परम प्रेम सुध्दा तसेच अनिर्वचनीय आहे. पवित्र प्रेमाचे सत्य सुक्ष्म,सरळ, रसमय,सुंदर वर्णन वाचून आपले मन भारावून जाते. तेव्हा मंडळी सर्वसंग परित्याग करून भगवंत भक्तिही करता येते.

आपण तर प्रापंचीक माणसे आहोत. आजच्या काळात ऊदा द्यायचे झाले तर मी समर्थ वचनावर विश्वास ठेऊन सांगावेसे वाटते की संसारी लोकांनी सुध्दा शुध्द प्रेम करावे. आपलं कुटुंब, कुटुंबातील इतर माणसे यांना प्रेमाने बांधून ठेवावे. कुणीही कुणाचा अनादर करू नये. आजच्या भौतिक जगाचा विचार केला तर सर्व भौतिक साधने मिळून सुध्दा माणूस सुखी नाही. कारण त्याला प्रेमाची भाषाचं कळली नाही। त्यासाठी तरी दासबोधाचे वाचन करावे या समासात समर्थ सांगतात त्या प्रमाणे पतीपत्नी ने एकमेकांना समजून घेऊन संसार करावा. टोकाचं पाऊल कुणीही ऊचलु नये. माणसाचा जन्म एकदा मिळाला आहे तर तो सात्विक तेने जपावा व संस्कृती सांभाळून संसार करावा. एकमेकांचे ऊणेदुणे काढून आयुष्याचं मातेरं करू नये.

(क्रमशः)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## शुद्ध वातावरण व पवित्र आचरण

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या घरातले वातावरण शुद्ध, शांत आणि पवित्र असावे. आपल्याकडे येणाऱ्या माणसाला परत जाऊच नये असे वाटावे. अगदी भगवंताच्या इच्छेने प्रपंच चालला आहे असे समजून, त्या प्रपंचात विद्या, वैभव, घरदार इ. सर्व काही यश संपादन करा; अगदी एखाद्या राजयोग्याप्रमाणे प्रपंचात ऐषआरामात राहून गाद्यागिरद्यांवर लोळा; पण हे करीत असताना तुमचे अंतःकरण मात्र भगवंताच्या प्रेमाने ओथंबलेले राहू द्या. कोणाशी वाद घालीत बसू नका. जगाचा मान फार घातक आहे; त्याची चटक लागली की मनुष्य त्याच्यामागे लागतो, नंतर मान मिळविण्याची कृती थांबते आणि मानही नाहीसा होतो. जगातले अजिंक्य पुरुषसुद्धा कुठेतरी विषयात गुंतलेले असतात, तिथे त्यांचा घात होतो. जगाला ते भारी असतील, पण त्या विषयापुढे त्यांचे काहीच चालत नाही. प्रेमात गुंतू नका, तसे द्वेषमत्सरातही गुंतू नका; दोन्ही सारखेच घातक आहेत. आपला प्रिय नातेवाईक मेला, आणि आपण ज्याच्यावर दावा लावला आहे तो भाऊबंद मेला; दोघेही मेल्याचे सुतक सारखेच ! त्याचप्रमाणे, मनुष्य प्रेमाने गुंतला काय आणि द्वेषाने गुंतला काय, नुकसान सारखेच होते. भगवंताचा विसर हा कोणत्याही कारणाने झाला तरी बरा नाही; मग प्रपंचात सुखसोयी असल्याने तो होवो किंवा प्रपंचात दुःख झाल्यामुळे होवो. ढोंग, बुवाबाजी इ. च्या भानगडीत तुम्ही पडू नका; अगदी काहीही न केलेत तरी चालेल, पण ढोंग मुळीच करू नका; आणि सर्वांनी माझ्यावर कृपा करा, अगदी अनुभवाने मी सांगतो, की बुवा होण्याच्या फंदात तुम्ही पडू नका. आपले कर्तव्य भगवंताच्या स्मरणात करून, त्याचे अनुसंधान अखंड टिकू द्या. आमची अशी वृत्ती बनण्यासाठी संतांच्या संगतीची आपल्याला जरुरी आहे. आपण सर्वजण सत्संगतीमध्ये आहोत असे म्हणतो, मग आमची वृत्ती का न सुधारावी ? तर संतांना ज्याची आवड आहे ते आम्ही धरले नाही, म्हणून आमची वृत्ती सुधारत नाही.

श्रीकृष्णाने उद्धवाला ज्ञान देऊन त्याला गोपींकडे पाठविले. भगवंताच्या नामामध्ये त्या रंगून गेल्या होत्या. गोपींचे नामावरचे प्रेम पाहून उद्धवाला आश्चर्य वाटले. नामामध्ये त्यांना भगवंत दिसत असे; ते पाहून उद्धवाने देवाला सांगितले, " देवा, तू मला ज्ञान दिलेस खरे, पण तुझ्या भक्तीचे प्रेम त्याहून श्रेष्ठ आहे, ते तू मला दे. " खरोखर, त्या नामाचे माहात्म्य देवाच्या वर्णनापेक्षाही कठीण आहे. तुम्ही सर्वजण इथे आला आहात; इथून रामाजवळून काही मागून न्यायचेच असेल तर त्या नामाचे प्रेम तुम्ही सर्वांनी मागा. सर्वांनी नामस्मरण करा आणि आनंदात राहा. राम कृपा करील, हा भरवसा बाळगा.

आपल्या जीवनात सहजता हवी. सहजतेमध्ये समाधान आहे.




## विड्याचे पान

ज्योतिर्मय साहित्य

जर तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी विडयाचे पान खाल्ले तर तुम्हाला त्यातून बरेच फायदे मिळतील. त्याच्या वापरामुळे शरीराचे अनेक रोग निघून जातात आणि आपले शरीर निरोगी होते. म्हणूनच तुम्ही विडयाचे पानांचे सेवन केले पाहिजे. चला जाणून घेऊया.

विडयाचे पान सेवन करण्याची पद्धत

हे सेवन करणे खूप सोपे आहे, एक ग्लास पाण्यात त्यामध्ये विडयाचे पाने उकळण्यासाठी टाका आणि पाणी अर्धा होई पर्यंत उकळावे. पाणी व्यवस्थित उकळले की आचेवरुन काढा आणि हे पाणी सकाळी सकाळी रिकाम्या पोटी प्या.

विडयाचे पानांचे सेवन करण्याचा हा योग्य मार्ग आहे. आपण जर असेच सेवन केले तर टाचेपासून शरीराच्या टोकापर्यंतचा प्रत्येक रोग दूर होईल आणि आपले शरीर निरोगी होईल. तर चला आता आपण जाणून घेऊया विडयाचे पानाच्या या काढा कोणत्याही आजारांना दूर करते.

मधुमेह फायदेशीर

मधुमेहाचे रुग्ण असलेल्यांनी विडयाचे पानांचा काढा घ्यावा. यामुळे रक्तातील साखर नियंत्रणात येईल आणि आपण या भयानक आजाराची गुंतागुंत देखील टाळाल. म्हणूनच, या आजारापासून मुक्त होण्यासाठी आणि रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी, आपण हा काढा घेणे आवश्यक आहे.

कोलेस्टेरॉल नियंत्रित करते

विडयाचे पान कोलेस्ट्रॉल नियंत्रित करतेच, परंतु हृदयरोगांना वाढण्यास प्रतिबंध करते. जर आपण दररोज विडयाचे पानांचा काढा घेतला तर ते शरीराचे खराब कोलेस्टेरॉल कमी करते आणि चांगल्या कोलेस्टेरॉलची पातळी वाढवते जेणेकरून गुठळ्या शिरेमध्ये तयार होत नाहीत आणि आपण हृदयविकाराच्या धोक्यापासून देखील सुरक्षित रहातो.

पोटाचे आजार बरे होतात

विडयाचे पानात फायबर आणि इतर पोषक घटक असतात. जे पोटाच्या आजारांना बरे करण्यास मदत करते. याच्या रोज सेवनामुळे पचन शक्ति मजबूत होते, जे अन्न पचन करण्यास मदत करते आणि आपण पोटदुखी, वायू, अपचन, बद्धकोष्ठता आणि आंबटपणा सारख्या समस्या टळतात. म्हणून, आपण ते सेवन केलेच पाहिजे.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

लठ्ठपणा नियंत्रित करते

विडयाचे पानांमुळे पोटाचे आजार बरे होतात तर लठ्ठपणा देखील नियंत्रणात राहतो. यामुळे चयापचय प्रणाली मजबूत होते, ज्यामुळे शरीरातून अतिरिक्त कॅलरी जळतात आणि लठ्ठपणा लोणीप्रमाणे वितळण्यास सुरवात होते. म्हणून, लठ्ठपणा कमी करण्यासाठी, आपण ते घेऊ शकता.

डोळ्याची कमजोरी दूर करा

विडयाचे पानात जीवनसत्त्वे आढळतात, ज्यामुळे डोळ्यांशी संबंधित आजार दूर होतात आणि डोळ्यांची कमजोरी दूर होते. डोळ्यावर चष्मा असल्यास, दररोज सकाळी रिकाम्या पोटी विडयाचे पानांचा काढा सेवन करा. हे आपला चष्मा काढेल आणि आपल्या डोळयांची रोशनी वाढेल.

हाडे मजबूत करते

जर तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी विडयाचे पानांचा काढा घेतला तर यामुळे हाडांची कमजोरी संपेल. आणि शरीराची हाडे मजबूत होतात. त्याचे सेवन केल्याने शरीरात कॅल्शियमची कमतरताही कमी होते. यासह, आपण सांधेदुखी आणि संधिवात समस्या टळते. म्हणून, आपण ते सेवन केलेच पाहिजे.

****

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## संत जनाबाई यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

ही बीजे, बाह्यता कोणत्याही उपायाने समूळ नष्ट होत नाहीत. तर त्यासाठी प्रखर अशी साधनाच हवी. त्यासाठी प्राण उर्ध्वरेता झाल्यानंतर जो योगाग्नी भडकतो त्या अग्नीतच ही बीजे नष्ट करावी लागतात. संत श्रेष्ठ जनाबाई जेव्हा असे म्हणतात की माझा क्रोध हा मुळापासून नष्ट झाला आहे, तेव्हा त्यांची साधन स्थिती किती उच्च होती, योगाग्नी चे तांडव सर्व शरीर भर कसे, अहो रात्र, व कित्येक वर्ष त्यांनी कसे सहन केले असेल! अशा स्थितीत राहूनही व्यवहारातील कामे कशी केली असतील ? याची आपण कल्पनाच केलेली बरी. पण ज्यावेळेस त्या असे म्हणतात की माझा क्रोध समूळ नष्ट झाला आहे तर त्यावेळेस त्या आत्म दर्शनाच्याही पुढे निश्चितपणे गेल्या आहेत असेच समजावे लागते.

आत्मदर्शन झाल्यानंतर समाधी अवस्थेत दृढता आल्याशिवाय शांतीचा जन्म होत नाही. अशी साधना दृढ झाल्यानंतर आत्म्याचा जो प्रकाश बुद्धीवर पडतो आणि त्यातून बुद्धीत स्फुरणा निर्माण होते तिलाच विवेक म्हणतात. मनातील विचार आणि मी तू पण संपलेले असते. त्यामुळे *विवेक म्हणजे विचार नाही*. या विवेकातूनच पुढे ऋतुंभरा प्रज्ञा प्रकटते.

संत जनाबाई असे निश्चयपूर्वक सांगतात की माझ्या बुद्धीत विवेकाने ठाणे निर्माण केले आहे. म्हणजे तो जन्म घेऊन स्थिरावला आहे.

निजपदी दिधला ठाव जनी म्हणे दाता देव

ज्या परमात्म्या पासून आपला आत्मा विलग झाला आहे त्याच परमात्म्याच्या चरणावर पुन्हा समाविष्ट होणे हेच सर्वांचे इती कर्तव्य असते. आत्म दर्शनानंतर सवीकल्प समाधी चा अभ्यास दृढतेने निदान बारा वर्षे करावा लागतो. यानंतर निर्वी कल्प समाधीचा अभ्यास पुढे बारा वर्षे किमान करावा लागतो. आणि त्यानंतरच प्रभू कृपा झाली की भक्तियोग मिळतो. आणि भक्ति योगातील शेवटचे गंतव्य स्थान म्हणजे परमेश्वर चरणी हा आत्मा स्थिरावने.

संत श्रेष्ठ जनाबाई जेव्हा असे म्हणतात की निजपदी मला ठाव दिला. मला स्थान दिले. त्याअर्थी भक्ती योगातील परमोच्च स्थिती त्यांनी प्राप्त करून घेतली होती. हे निर्विवाद सत्य आपण जाणून घेऊ यात.

अभंगाच्या सुरुवातीला मी असे म्हणालो होतो की, हा वर वर अतिशय सोपा वाटणारा अभंग आहे, पण ज्या ज्या स्थितीचे वर्णन संतश्रेष्ठ जनाबाई या अभंगात करतात ती स्थिती प्राप्त करणे अतिशय दुरापास्त आहे. कठोर साधना, अविरत ध्यास व गुरू कृपा याशिवाय हे शक्य होत नाही. अशा कठोर साधनेतून त्यांनी निश्चयपूर्वक ती स्थिती प्राप्त केली आणि साधनेचे परमोच्च स्थान, म्हणजे भगवंताच्या चरणावर त्या विसावल्या, हे आपणास कळून येईल घरकाम करणारी एक साधारण स्त्री, असे वाटणारी जनाबाई ही किती मोठी सिद्ध संत होती. त्यांचा अधिकार किती मोठा होता, हे आपणास या अभंगातून जाणवल्या शिवाय राहणार नाही. जगन्माऊली संत श्रेष्ठ जनाबाईच्या चरणावर विनम्र अभिवादन करून हा लेख इथे संपवूयात.

निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई एकनाथ, नामदेव तुकाराम
वामसव्य दोहींकडे ।
देखूं कृष्णाचें रुपडें ।।१।।
आतां खाले पाहूं जरी ।
चहूंकडे दिसे हरी ।।२।।
चराचरीं जें जें दिसे ।
तें तें अविद्याची नासे ।।३।।
माझें नाठवे मीपण ।
तेथें कैंचें दुजेपण ।।४।।
सर्वांठायीं पूर्ण कळा ।
दासी जनी पाहे डोळां ।।५।।

संतश्रेष्ठ जनाबाई यांचा हा एक गोड अभंग आहे. हा अभंग म्हणजे प्रत्यक्षात जनाबाई यांनी घेतलेला साधन मार्गातील दिव्य अनुभव आहे. **(क्रमशः)**

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यममृतवृष्टिहेतवे।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं विषप्रभावनाशिनि।। २० ।।**

अमृतवृष्टीसाठीजगदंबिके, तुला नमस्कार असो. विषाचा प्रभाव विनष्ट करणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यमनुपमे मनोरमे।**
**नमस्तेऽस्तु महामाये मनसः शान्तिहेतवे।। २१ ।।**

हे अनुपमे, मनोरमे, जगदंबिके, तुला नमस्कार असो. मनाच्या शांतीसाठी महामाये, तुला नमस्कार असो.


**जगदम्ब नमस्तुभ्यं कल्याणकर्त्रिते नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं मन्मानसे स्थिते नमः।। २२ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. कल्याण करणारे तुला नमस्कार असो. माझ्या मनामध्ये स्थित, जगदंबिके, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं कृपाकर्त्रि नमो नमः।**
**नमस्तुभ्यं जगन्मातः परशुराममातृके।। २३ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. कृपा करणारे तुला नमस्कार असो. हेजगज्जननी, परशुरामाचे आई, तुलानमस्कार असो.

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

कैकयी उपवनात कलिंगड खात होती.सात्विक माणसे कलिंगड लाल मांसा सारखे दिसते म्हणून ते खात नाहीत.कलिंगडातून कली कैकयीचा पोटात गेला असे भावार्थ रामायण सांगते.वाल्मीक रामायणात सरस्वतीने मंथरेचीची बुद्धी बिघडवली असे लिहिले आहे.

भूक माणसाची बुद्धी बिघडविते .अयोध्येत कोणी भुकेले नव्हते सर्व सज्जन मग कोणाची बुद्धी फिरवावी मग अयोध्येत असणारी पण तेथील नसणारी अशी एकमेव व्यक्ती म्हणजे मंथरा .तिची बुद्धी फिरवा.तिने कौसल्याच्या दासिस विचारले काय चालले आहे?त्या म्हणे *आमच्या* रामास उद्या राज्याभिषेक आहे.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

या आमच्या शब्दाने सरस्वतीने मंथरेची बुद्धी बिघडवली. विकल्प मनात निर्माण झाला की विकल्पातून निर्माण होणारे अन्य विकल्पातच माणूस अडकून पडतो. सरस्वतीच ती, तिनेच डोके फिरवले अनेक नवे विकल्प जन्म घेऊ लागले.मंथरा कैकयीस म्हणे मूर्ख आहेस का तू? तू या कठीण प्रसंगी झोपू कधी शकतेस?कैकयी म्हणे मला कोण बोलेन?तुझ्या साठी संकटाची मालिका सुरू होतेय.मंथरा म्हणे रामास राज्याभिषेक होणार आहे.कैकयी आनंदाने मोहरली. काय माझ्या रामास राज्याभिषेक होणार आहे? ती म्हणे आमच्या नाही त्यांच्या म्हण.या आनंदात कैकयीने एक कंठा तिला भेट दिला. मंथ रेने तो परत भिरकावला.ती म्हणे तुझा नवरा एव्हढा सरळ नाही.समोर गोड गोड बोलतो.भरत इथे नेमका का नाही.याचवेळी हे का ठरले? इतकी घाई का? कैकयीला हे हळू हळू पटायला लागले.

(क्रमशः)

## फुलमाला....





शेवंती...

मनमोहक सुगंध हीचा
विविध रंगात फुलती
सर्वांसाठी उमलते जणू
प्रसन्न,प्रफुल्ल ही शेवंती

केशसंभारात दिसे छान
सजावटीची असे शान
देव मूर्तीवर शोभायमान
शुभ कार्यात हिला सन्मान

सौ. माधुरी म .इनामदार, मिरज





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

### भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी रवींद्रनाथ - भाग दोन

रवींद्रनाथांच्या परदेश दौऱ्याचा दुसरा टप्पा १९२० पासून सुरू झाला. या दुसऱ्या टप्प्यात त्यांनी ब्रिटन, अमेरिका, जर्मनी, स्वीडन, फ्रान्स आणि इतर देशांना भेटी दिल्या. याप्रसंगी त्यांच्यासोबत त्यांचा मुलगा आणि सून होते.

त्यांच्या अमेरिकेच्या दौऱ्यात त्यांनी अनेक ठिकाणी व्याख्याने देऊन लोकांपर्यंत भारतीय संस्कृती आणि परंपरा प्रभावीपणे पोहोचवण्याचा प्रयत्न केला. या अमेरिका भेटीच्या दरम्यान त्यांची भेट एका उच्चशिक्षित अमेरिकन तरुणाशी झाली त्याचे नाव एल्म हर्स्ट असे होते. हे एल्म हर्स्ट कृषी आणि अर्थतज्ञ होते. त्यांचा नुकताच डोरोथी व्हिटने स्टेट या श्रीमंत कुटुंबातील तरुणीशी विवाह ठरला होता. रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव या दोघांवरही जबरदस्त होता. एल्म हर्स्ट यांनी तर नंतर आपल्या नोकरीतून निवृत्त होऊन रवींद्रनाथांच्या मार्गदर्शनाखाली भारतातील ग्रामीण भागाच्या पुनर्रचना आणि विकासाच्या कामासाठी स्वतःला वाहून घेतले.

ब्रिटन आणि अमेरिकेखेरीज फ्रान्स, जर्मनी, स्वीडन, ऑस्ट्रिया आदी देशांमध्ये रवींद्रनाथांचे अभूतपूर्व असे स्वागत झाले. जर्मनीत तर त्यांच्या भेटीसाठी लोकांनी गर्दी केली. त्यांच्याबरोबर असलेला त्यांचा मुलगा या संदर्भात असे लिहितो, '' मध्य आणि उत्तर युरोपातल्या लोकांनी त्यांची पायधूळ घेतली. गर्दीच्या सभांमध्ये आणि रेल्वे स्टेशनवर लोक एकमेकांशी रेटारेटी करून वडिलांच्या अंगरख्याला तरी स्पर्श व्हावा म्हणून पुढे झेपावत होते. त्यांच्या पुस्तकांची विक्री विलक्षण होती. जर्मनीत तर लाखो प्रती विकल्या गेल्या. ''

या युरोपभेटीच्या ( १९२४ ) दरम्यान रवींद्रनाथांचा युरोपातील अनेक विद्वान आणि महान लोकांशी परिचय झाला. पुढे त्यातील बऱ्याच लोकांनी रवींद्रनाथांना त्यांच्या कार्यात मदत केली. माणसे जोडून ठेवण्याची कला रवींद्रनाथांना अवगत होती. केवळ आपल्या कामापुरते लोकांशी संबंध त्यांनी कधीच ठेवले नाहीत तर वेळोवेळी अशा लोकांशी प्रेमपूर्वक पत्रव्यवहार करून त्यांचे संबंध जपून ठेवले.

आपल्या पुढील प्रवासात रवींद्रनाथ चीनमधील शांघाय, हानचाऊ, नानकिंग आणि पेकिंग या ठिकाणी थांबले. तेथील लोकांनी त्यांचे मोठ्या प्रेमाने स्वागत केले. रवींद्रनाथ भारतीय प्राचीन संस्कृती आणि सभ्यता यांचा परिचय करून देण्यासाठी चीनमध्ये आले आहेत हे चिनी नागरिकांनी ओळखले आणि त्यांचा योग्य तो सन्मान केला. चीनमधील एक विद्वान आणि विचारवंत प्रोफेसर लिआंची चाऊ रवींद्रनाथांच्या गौरवपर भाषणात म्हणाले, '' भारतीय संस्कृती सभ्यता, प्रेम आणि स्वातंत्र्य यावर आधारलेली आहे. या गोष्टींचे प्रतिबिंब आपल्याला रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्वात आणि कवितांमध्ये आढळते. भारतीय संस्कृतीमधील प्रेम, सभ्यता आणि स्वातंत्र्य या गोष्टी अनुकरणीय आहेत. ''

यानंतर त्यांनी जपानला भेट दिली. त्यांना असे आढळले की युरोपमध्ये आपापसात युद्ध घडवून आणणारा स्वार्थी राष्ट्रवाद जपाननेही अंगीकारला आहे. जपानने पाश्चिमात्य देशांच्या पावलावर पाऊल ठेवले हे पाहून त्यांना अतिशय वाईट वाटले. त्यांनी तिथे केलेल्या भाषणात आपली ही खंत स्पष्टपणे बोलून दाखवली. ते म्हणाले,'' ही काय राष्ट्राची मूल्ये आहेत ? विध्वंसक यंत्र आणि नफेबाज दुहेरी नीतीमुळे नीतीमूल्ये ढासळत चालली आहेत. आणि मानवातील परस्पर बंधूभावाची भावना ही नष्ट होते आहे. एक तर तुम्ही लालचावले आहात किंवा तुम्हाला याचा स्वीकार करणे भाग पडत आहे. ''


त्यानंतरचा त्यांचा प्रवास समुद्रमार्गे झाला. अटलांटिक महासागरातून प्रवास करत ते ब्यूनॉस आयर्सला पोहोचले. या सततच्या प्रवासाने मात्र ते आजारी पडले. परंतु त्या ठिकाणी त्यांची एक चाहती असलेल्या व्हिक्टोरिया उकांपू या तरुणीने त्यांची अतिशय हळुवार आणि प्रेमपूर्वक शुश्रुषा केली. तिच्या काळजीपूर्वक केलेल्या सेवा आणि शुश्रुषा यामुळे रवींद्रनाथ या मोठ्या आजारातून बरे झाले. त्या दोघांमध्ये स्नेहबंध निर्माण झाले. रवींद्रनाथांनी त्या ठिकाणी आपल्या काही कविता लिहिल्या आणि त्या कवितांचे पुस्तक व्हिक्टोरियाला अर्पण केले.

(क्रमशः)

# देशी वृक्षांची लागवड करा

ज्योतिर्मय साहित्य

मागील काही वर्षात शहरात सिमेंटच्या जंगलाने गर्दी केली आहे. मोठमोठ्या इमारती आणि टॉवर्स उभे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली आहे. जितक्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली तितक्या प्रमाणात वुक्ष लागवड करण्यात आली नाही. परिणामी पर्यावरणाचे संतुलन बिघडले. त्याचा परिणाम तापमान वाढीवर झाला. तसेच बेसुमार वृक्षतोडीमुळे अनियमित पाऊस, उष्णता अशा संकटांना तोंड द्यावे लागले. यावर मात करण्यासाठी गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्र सरकारने वृक्षारोपणाची मोहीम हाती घेतली आहे. दरवर्षी या मोहिमेअंतर्गत लाखो वृक्षांची लागवड केली जाते. या मोहिमेत शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, विविध सामाजिक व सेवाभावी संस्था, तरुण मंडळांनी यात हिरीरीने भाग घेतला. नागरिकांनीही आपल्या घराजवळ, बागेत, शेतात मोकळ्या जागेत, माळरानावर वृक्षारोपण केले. यावर्षीही ही मोहीम मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येणार आहे. या वृक्षारोपण मोहिमेत परदेशी वृक्ष मोठ्या प्रमाणावर लावण्यात येतात. जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करणे आवश्यक असताना ज्या परदेशी वृक्षांची आपल्याला आवश्यकता नाही ; त्यांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. परदेशी वृक्षांमुळे जैवविविधता मोठ्या प्रमाणावर नष्ट होऊ लागली आहे. त्याचप्रमाणे वाढते तापमान, वातावरणातील बदल दूर करण्यातही परदेशी वृक्ष अपयशी ठरत आहे. देशी वृक्षांमुळे पावसाचे पाणी भूगर्भात टिकून राहते. विदेशी वृक्षांमुळे जमिनीची पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता नाहीशी होते. दुष्काळामागे हे ही एक महत्वाचे कारण आहे. विदेशी झाडांच्या आम्लयुक्त पानांमुळे जमिनी नापीक होत आहे. विदेशी झाडांच्या फुलात परागकण नसतात त्यामुळे त्यावर फुलपाखरे किंवा भुंगे यासारखे कीटक येत



नाहीत. विदेशी झाडांच्या पानांनी आणि सावलीने जमीन निकृष्ट होत आहे. या वृक्षांच्या फांद्यांचा आणि बुंद्याचा काहीही उपयोग होत नाही. विदेशी वृक्षांमुळे रातकिडे,

श्याम ठाणेदार
पुणे

वटवाघूळ, घारी, गिधाडे, चिमण्या कावळे, घुबड, कबुतरे, पोपट यासारखी सरास् दिसणारे पक्षी दिसेनासे झाली आहेत. एकंदरीत अशा विदेशी वृक्षांमुळे होणाऱ्या परागकण प्रक्रियेला आणि पक्षांद्वारे होणाऱ्या बिजप्रसाराच्या कामाला खीळ बसत असून कीटक, किडे, पक्षी जोडणारी निसर्गाची अन्न साखळी कुमकुवत होत आहे. देशी वृक्ष आपल्या जंगलात किंवा परिसरात पर्यावरणाचा समतोल साधत असतात. त्यांच्या आस्तित्वशी जुळवून घेतलेली, त्यावर जोपासली जाणारी सजीव व्यवस्था असते. या सजीव अवस्थेत मनुष्य, पशुपक्षी, कीटक सामावले असतात. देशी वृक्षांमुळे पक्षांना कीटकांना, किड्यांनाही निवारा मिळतो. विघटन झालेल्या पालापाचोळ्याच्या खतातून निर्माण होणारी पोषकद्रव्ये पुन्हा वृक्षाकडे पाठवण्याचे काम वृक्षांची दूरवर पसरलेली मुळे करत असतानाच जमिनीत खोलवर जाऊन ती जमिनीवरच्या मातीला धरून ठेवतात. विविध कीटकांना, किड्यांना आणि सरपटणाऱ्या जीवांना अशी जमीन उपयुक्त ठरते आणि एक परिपूर्ण पर्यावरण निर्माण होते. विदेशी वृक्ष पुरेसा ऑक्सीजनही देत नाहीत. देशी वृक्ष जितका ऑक्सीजन देतात तितका ऑक्सीजन विदेशी वृक्ष देत नाहीत. काही देशी वृक्ष तर चोवीस तास ऑक्सीजन देतात. वातावरणातील ऑक्सीजन कमी होऊ द्यायचा नसेल तर देशी वृक्षांचीच लागवड करावी. वड, पिंपळ, कडुनिंब, आवळा, चिंच, फणस, आंबा, बेल, कदंब, पळस या वृक्षांची जास्तीतजास्त लागवड करण्यात यावी. देशी वृक्ष औषधी असतात शिवाय हे वृक्ष मोठे झाल्यास त्याची दाट व थंडगार सावलीही मिळते त्यामुळे जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करायला हवी.

# पंढरीची वारी ! अवघ्या भक्तांसी तारी !

ज्योतिर्मय साहित्य

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पांडुरंगाच्या चरणी लीन होण्यासाठी, त्याच्या चरणी डोकं टेकवून त्याचं मनोभावे दर्शन घेण्यासाठी लाखो भाविक भक्त महाराष्ट्रातून पंढरीला जाण्यासाठी पायी चालत चालत वारीमध्ये सहभागी होत असतात. कित्येक भक्त देशाच्या अन्य प्रांतातून सुध्दा वारीमध्ये सहभागी होत असतात. विशेष म्हणजे या वारीत आठ वर्षांच्या लहान मुलांमुलींपासून ते वृध्द सत्तर,पंचाहत्तर अथवा त्याही पूढच्या वयाचे आजीआजोबा पायी चालत वारीत सहभागी होत असतात. त्यांचा केवढा हा उत्साह! विठ्ठलाप्रती केवढी ही अंतर्मनातून अगाध निष्ठा, विठ्ठलाला भेटण्याची अंतर्मनाची तळमळ असते. ही एकनिष्ठ तसेच, एकचित्त भक्ती असते. इथे कुठल्याही प्रकारच्या प्रलोभनांचा मोह किंवा आकर्षण त्यांना नसते. फक्त मुखात विठ्ठल नामाचाच गजर होत असतो. कुणी विठ्ठलाची गाणी म्हणत असतं. कुणी जय जय विठ्ठल! जय हरी विठ्ठल म्हणत जयजयकार करीत असतं. विशेष म्हणजे हे सर्व रस्त्यांवरुन अविरतपणे चालत चालत चालू असतं. कित्येक बायका तर डोक्यावर तुळशीवृंदावन घेऊन चालत असतात. हे एवढं करत असताना कोणाही वारक-यास थकवा अजिबात जाणवत नाही. त्यांना विचारलं तर ते म्हणतात ही विठूमाऊलीची कृपा आहे. शेकडो किलोमीटरचा प्रवास ही लहान मुलं, तरुण युवक युवती तसेच वृध्द आजीआजोबा हसत खेळत करीत असतात. हे पंढरीच्या वारीचं खास वैशिष्ट्य आहे. थोर संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींनी चालू केलेली ही पंढरीची वारी आज साडेसातशे वर्षांनंतरही तितक्याच उत्साहाने महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे वारकरी दरवर्षी आषाढ महिन्यात पालख्यांद्वारे पंढरपूरला जातात. आळंदी येथून संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींची पालखीचे पंढरपूरला प्रस्थान होत असते. देहू येथून जगद्गुरु थोर संत श्री तुकाराम महाराज यांच्या पालखीचे प्रस्थान होत असते. शेगाव येथून श्री गजानन महाराजांच्या पालखीचे प्रस्थान होत असते. त्याप्रमाणे श्री निवृत्तीनाथांच्या पालखीचे, श्री सोपानदेवांच्या पालखीचे व श्री मुक्ताईदेवीच्या पालखीचे प्रस्थान होत असते. तसेच, महाराष्ट्रातील इतरही दिडशे दोनशे विविध पालख्यांचे प्रस्थान होवून सर्व पालख्या आषाढी एकादशीपर्यंत पंढरपूरात पोहोचतात.



हा त्यांचा दरवर्षीचा नियम आहे. सर्वच वारकरी तो श्रध्देने व आत्मियतेने पाळतात. विठ्ठल हा असा देव आहे की, ज्याला विशेष

चला वारीला

लेख व काव्यरचना
मधुकर निलेगावकर,पुणे
९४२१३७५६९१



असे कोणतेही सोवळेआवळे नाही. कोणतीही विशेष पूजाअर्चा नाही. अठरापगड जातींचे लोक त्याच्या पायाला स्पर्श करुन डोके टेकवून दर्शन घेतात आणि धन्य धन्य होतात. या देवाकडे पांडुरंगाकडे उच्च,नीच व गरीब, श्रीमंत तसेच, स्त्रीपुरूष असा भेदभाव नाही. भारतातील इतर कुठल्याही देवस्थानातील देवाचे दर्शन वीस ते पंचवीस फुटांवरून तेही खूप घाईघाईत घ्यावे लागते. विठ्ठल हा भाव, भक्तीचा भुकेला देव आहे. जो भक्त अंतर्मनातून

भक्ती करतो. त्याला विठ्ठलदेव त्वरीत पावतो.

याची अनेक उदाहरणे आहेत. त्याची प्रचिती त्या त्या भक्तांना आली आहे. थोर संत जनाबाईला विठ्ठलदेव दळण दळायला मदत केली. थोर संत श्री एकनाथ महाराजांच्या घरी पांडुरंगाने श्रीखंड्या नावाने पाणी भरण्याचे काम केले. थोर भक्त पुंडलिकला विठ्ठलाच्या दर्शनाला जाता आले नाही म्हणून स्वतः विठ्ठल देव त्यांच्या घरी आले. तेव्हा, भक्त पुंडलिक आईवडीलांची सेवा करीत होता. म्हणून त्याने पांडुरंगास थोडावेळ थांबण्यास सांगितले आणि एक वीट देवाकडे टाकली. विठ्ठलदेव त्याच्यावर कटीवर हात ठेवून उभे राहिले. हे देव आणि भक्त यांचं एकमेकांवर अढळ, एकनिष्ठ अंतर्मनाचं, अंत:करणातील प्रेम आहे. युगानुयुगे ते चालत आलेलं आहे. असंच, निष्ठावान भक्तिचं उदाहरण कलियुगातील या एकविसाव्या शतकातील सध्याच्या तिसऱ्या दशकात चालू वर्ष २०२५ च्या आषाढी वारीत अनुभवायला मिळालं आहे. एका व्हिडिओ चॅनलने एका वृध्द आजोबांची भेट घेवून पंढरीच्या वारीबाबत त्यांना काही प्रश्न विचारले त्याचीही त्यांनी दिलखुलासपणे उत्तरे दिली. बाबांच्या अंगावर एक शर्ट व पांढरे धोतर होते. तसेच, डोक्यावर एक पिशवी व खांद्याला एक पिशवी होती. चॅनेलच्या माणसाने बाबांना

विचारलं एवढी ताकद कुठून येती बाबा! बाबांनी सांगितले ''माऊलींची कृपा'' आज माझी ही ६८वी वारी आहे. माझा जन्म १९२८साली झाला. आता तुमचं वय काय? तर म्हणाले आता त्यांचं वय ९६ वर्ष आहे. तुमच्यासोबत कुणी आहे का! तर म्हणाले कुणीही नाही. एकटाच आहे. सारेजण वारीसोबत चालत जातात, पळत जातात. मी

मात्र सावकाश सावकाश चालत जातो. म्हणजे बाबा तुम्ही शेवटच्या मुक्कामापर्यंत पालखीसोबत बिनाचपलीचं चालत जाता!

(क्रमशः)



## इंदापूरी निखारे

### लाखों तारे...



ज्योतिर्मय साहित्य

लाखों तारे...
असामान में...
इक मगर ढुंडे ना मिला...
देखके दुनिया की दिवाली...
दिल मेरा चूप चाप जला...
एक अतिशय आवडते गाणे...
याचा अर्थ प्रत्येकाला वेगवेगळा अनुभव देत असणार...
मला पण वेगळ्या अर्थाने भावतो...
आपण एकटेच आहोत ही भावना मनात कोठेतरी येऊन जाते...
आकाशात असलेल्या अनेक ताऱ्यांकडे पहात पहात...
त्या ताऱ्यांच्या अंधुक प्रकाशात...
त्यातील एखादा किरण...
आपल्याला स्वप्न पूर्ण करण्यासाठी साथ देईल...
अशी आशा मनात...
अस्वस्थ का होईना!
केव्हा तरी पहाटे...
जाग येईपर्यंत...
वास्तवातल्या जगण्याला सुरुवात पण होऊन जाते...
लक्षात येते केव्हातरी...
त्या अनेक कुटुंबापैकी एखाद्या कुटुंबाला...
त्या पतिपत्नीला...
आपण एकटेच आहोत...
आपल्या मुलींच्या स्वप्नपूर्ती साठी...
आपल्यालाच करावी लागणार...
ती दोघे निर्णय घेतात...
मुलींच्यासाठी शिक्षणासाठी...
ते दोघे प्रणयक्रीडा करतांनाचे व्हीडिओ...
२०००/रुपये पर व्हीडिओ...
अतिशय नाईलाजाने...
करत होते...
लाखों तारे आहेत...
मदत करणारे अनेक हात असतात...
तरीपण, का?
संस्कार, संस्कृती...
नैतिकता वगैरे वगैरे आहेच...
पण वास्तवाने भाग पाडले होते...
फक्त एकच अपेक्षा असावी त्यांना...
या आमच्या अशा परिस्थितीला...
निदान बदनाम तरी करू नका...


ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ



आठवणीतले बालपण

मित्रांनो, प्रत्येकाच्या आयुष्यात बालपणीचे विशेष महत्व असते, रम्य ते बालपण, खरंच बालपणीसारखी मज्जा परत कधीच येत नाही आता ते दिवस आठवले तरी मन खूप प्रसन्न होतं, तर आपण सर्वजण परत एकदा त्या बालपणीच्या विश्वात जाऊया, त्या आठवणींना एकदा उजाळा देऊयात ज्योतिर्मयच्या माध्यमातून. मग लिहायला सुरुवात करा व पटकन पाठवा मला 7743918559 या व्हाट्सअप नंबरवर
- संजय व्यापारी, संपादक,
ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ.

ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# शिवरायाचा आठवावा प्रताप - किल्ले रायगड

**ज्योतिर्मय साहित्य**

दि.५/१०/२०१८ रोजी डॉ. आबा देशपांडे संभाजीनगर, डॉ. जवाहर सोळंके पुणे, डॉ.शेजवळे, डॉ.प्रमोद दोशी सांगली व माझा सहभाग होता. पुणे-रायगड ताम्हिणी घाट या मूळसी डॅम्पचे बॅक वाटर व रायगड जिल्ह्याच्या सीमेवर असलेले एक निसर्गरम्य स्थळ, सोबतच कुंडलीका व्हॅली. ऑक्टोबर महिना जरी असला तरी सह्याद्रीच्या डोंगर कपारीतून प्रवाहीत होणारे धबधबे आपलं अस्तित्त्व दाखवत होते. डोंगरदर्या हिरव्या शालूने नटलेल्या होत्या.

आम्ही जवळपास तिन तास अंधारवनात पायवाटेने मार्ग काढत भटकंती केली. नांवा प्रमाणे वनराईच्या सानिध्यात अंधाऱ्या पायवाटेने मार्गस्थ झालो होतो. पक्ष्याची किलबीलाट वातावरणात सृष्टी सौंदर्य वाढवत होती. दुतर्फा असलेल्या वृक्षराईतून अरुंद व अवघड वाट व मार्गात झुळझुळ वाहणारे पाणी पावलांना विसावा देत होते. एकीकडे उंच उंच सह्याद्रीचे कडे तर दुसरीकडे खोल खोल दरी डोळे व मन सुखवणारे व निसर्गराजाची संपन्नता दाखवणारी होती. पावसाळा संपवून हिवाळ्याची चाहूल रानफुला मुळे होत होती. वनसृष्टी च्या निरीक्षणात तिन तास केंव्हा संपले ते समजलेच नाहीत. ताम्हीनी घाटाचा घाटवळणाचा रस्ता पार करत रायगडकडे मार्गस्त झालो होतो. रात्र झाल्यामुळे रायगडच्या पायथ्याशी असलेल्या गांवी मुक्काम केला.

दि.६ /१०२०१८ रोजी सकाळीच रोपवे द्वारे शिवरायांच्या स्पर्षाने पावन झालेल्या किल्ले रायगडला पोहचलो. समुद्र सपाटी पासून २८५० फूट उंचीवर सह्याद्रीच्या पहाडी पण सपाटभागी असलेला १२०० एकर व्याप्ती तर १०० एकर पठारी प्रदेश असलेले छ. शिवरायांची ही राजधानी ! सन १६५६ साली रायरीच्या चंदरराव मोरे बरोबर लढाई करुन रायगड हस्तगत केलेला आहे. सध्या महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व विभागाच्या नियंत्रणात आहे.

सुमारे ११ तलाव व ८४ पाण्याचे टाके आज ही आपले अस्तित्त्व दाखवत आहेत. महाराजांचे पवित्र समाधी स्थळ, हिरकनी बुरुज, टकमक टोक, वाघ बीळ, माता शिरकाई मंदिर, जगदेशश्वर मंदिर, बाजार पेठ, होळीचा माळ, नगार खाना, धान्याचे कोठारे, पाच तोफा, खलबत खाणे इत्यादी ऐतिहासिक साक्षीदार शिवकाळाचे जणू वैभव च कथित करतात. हत्ती तलाव पहाताना विशाल व महाकाय हत्ती इतक्या उंची वर कसे आले हा प्रश्न पडतो.... पण बाल हत्ती संगोपनासाठी आणले होते. नंतर ते महाकाय झाले. गंगासागर तलावाचे निरक्षण करतांना गंगासागर हे नांव कसे पडले याचा प्रश्न मनात आला. पण महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगी दि.६ जून १६७४ प्रसंगी सप्त नद्यांचे अभिषेका नंतरचे जल त्या एकतलावात टाकले तेंव्हा पासूनच ''गंगा सागर'' हे नांव प्रचलित झाले.

किल्ल्याचे बांधकाम तत्कालीन स्थापत्य तज्ञ हिरोजी इंदुलकरानी अनंत अर्थिक संकटाचा संघर्ष करत संपुर्ण रायगडाचे बांधकाम १४ वर्षात पुर्ण केले. शिवरायांनी इंदुलकरा नां बक्षिस बाबत विचारना केली तेंव्हा त्यांनी मंदिराकडे जाणाऱ्या प्रवेशद्वाराच्या पायरीवर माझे स्वत:चे नांव असावे असा मानस व्यक्त केला. जेणे करुन शिव भक्तांची धूळ मस्तकी लागावी हा उदात्त हेतू होता. त्यास महाराजांनी सन्मान पुर्वक संम्मती दिली.

आजही शिला लेखात ''सेवेसी तत्पर हिरोजी इंदुलकर'' हा मजकूर मोडी लिपीत व्यक्त केल्याने गडावरील शिवअभियंत्याचे स्मरण अजरामर आहे!

हिरकनी गडाच्या पायथ्याशी राहणारी व रोज गडावर दुध पुरवठा करणारी हिरकनीबाई एक स्त्री होती. कोजागिरीच्या दिनी तिला दुध वाटप करायला विलंब झाल्याने गडाचे महाद्वार बंद झाले होते. तिला आपल्या तान्हूल्या बाळासाठी घरी जाणे जरुरी होते. तिने त्या रात्री स्वत:च्या जीवाची परवा न करता कड्या वरुन उडी मारुन बाळा साठी घर गाठले. हे मातेचे धाडस महाराजांना समजताच तिचा



साडी-चोळी देऊन सन्मान केला व त्या कड्याचे नामांतर ''हिरकनी बुरुज'' करुन धाडसी मातेच्या स्मृती जतन केल्या. नंतर गडाच्या तटबंदीतील त्रुटी दुर करण्यात आल्या ! नंतरच्या काळात इंग्रजांच्या राजवटीच्या कालखंडात किल्ले रायगडला आग लावली होती त्यात गडाचे अतोनात नुकसान झाले होते.... बराच काळ राजांचे वास्तव्य राहिलेला हा संपुर्ण गड निरक्षणासाठी २-३ दिवसाचा अवधी लागतो.

मराठी मनावर अधिराज्य करणाऱ्या महाराजांच्या पवित्र समाधी स्थळाला विनम्रता पूर्वक अभिवादन करत परतीचा मार्ग धरला ! शिवतर घळ तपो भूमी (दि.७/१०/२०१८) महाड पासून ३०-३२ कि.मी. अंतरावर असलेले व शिवरायांचे गुरु रामदास स्वामीचे साधनेचे पवित्र स्थळ! तेथे शिवरायांचा व रामदास स्वामींचा सहवास राहिलेला आहे. दोन पर्वता च्या मधील जागा म्हणजे घळ.हे सह्याद्रीच्या कुशीतील अति दुर्गम ठिकाण. मुळ रस्ता संपताच तपोवनची कमान व त्या नंतर २०-२५ पायर्या चढून पवित्र क्षेत्र येते. सन १६४९ - १६६० या कालखंडात स्वामींचे वास्तव्य साधनास्थळी होते. मंदिराच्या बाजूनेच मोठा धबधबा सतत प्रवाहित असतो. धबधब्यातील उंचावरुन पडणारे पाणी प्रचंड आवाजा त वहाते. काळ नदीचा उगम स्थान मानल्या जाते. ग्रंथराज

दासबोध व मनाच्याश्लोका ची उत्पती येथेच झाली. त्या मुळे रामदास स्वामी ओव्या सांगत आहेत व कल्याण स्वामी ते लिहीत असल्याचा ऐतिहासीक प्रसंग विशाल शिल्पातून शिल्पकाराने निर्माण केलेला आहे! त्या समोरील जागेत १००-१५० साधक बसतील एवढी जागा आहे. शेजारीच प्रभू राम, लक्ष्मण व सीतामाते च्या मुर्त्या. या निसर्ग रम्य स्थळा ला रामदास स्वामी ''सुंदर मठ'' म्हणत.

वनराई व निसर्गरम्य क्षेत्र म्हणजे सध्याच्या मोबाईल व सोशल मेडियाच्या भूल-भुलयात हरवलेल्या मानवी जीवनात शिवतर घळ म्हणजे आत्मचिंतन व आत्मशोध घेण्याची जागा ! कांही काळ स्तब्ध व ध्यानस्थ बसल्यावर आत्म्याने परमात्म्याला दिलेली साद निश्चितच ऐकायला मिळेल !

स्वराज्याची शपथ- रायरेश्वर मंदिर

नागमोडी वळनाची वनराईने सुशोभित झालेली वाट वरंधा घाट मार्गा कडे मार्गस्त झालो. सह्याद्रीचे उंच शिखरे व दर्या खोर्याचा कोकणाची वाट भोर कडे जाते. बराच भाग ढगाळ धुक्याच्या आवरणात झाकल्याने लांब वरचे दृष्टीक्षेपात येत नाही !

घाटचा रस्ता व कोकण पट्टा संपवत भोर आले. तेथून २४-२५ कि.मी. अंतरावर असलेले रायरेश्वरचे पठार ट्रेकर्सच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त ठिकाण.

चढाईला अतिशय अवघड ! सुरवातीला डोंगर पहाड पोखरुन केलेल्या पायर्या व कांही उंचीवर लोखंडी शिडी चा उपयोग करत चढावे लागते. ही लोखंडी शिडी सातारच्या शिवरायाच्या वंशजांनी तयार केलेली आहे असे समजले. हा सह्याद्रीचा कडा असून हे रायरेश्वरचे पठार किंवा रायरेश्वरचा किल्ला असे संबोधल्या जाते.पठाराचा वरचा भागा पासून एक ते दिड कि.मी. अंतरावर रायरेश्वर म्हणजे शंभू महादेवा चे पांडव कालीन व हेमाडपंथी शैलीत बांधलेले मंदिर आहे.जेथे बाल शिवबां नी वयाच्या १५ व्या वर्षी सन १६४५ साली हिंदवी स्वराज्य निर्मीती साठी संकल्प शपथ स्वत: च्या हाताचे बोट कापून रायरेश्वरवर रक्तअभिषेक करत घेतली... त्यांच्या सोबत कान्होजी जेधे,बाजी पासलकर, तानाजी व सुर्याजी मालुसरे, एसाजी कंक, सुर्याजी काकडे, बाबजी मुदगल हे वीर मावळे होते. व येथूनच खऱ्या अर्थाने स्वराज्य निर्मीती या उदात्त कार्याची सुरवात झाली. मंदिराच्या समोर उंच चबूतर्यावर छ.शिवाजी महाराजांचे शिल्प तयार केलेले आहे !

हे अत्यंत महत्वाचे ऐतिहासिक स्थळ आहे पण जीर्णोध्दार व परिसर सुशोभिकरणा पासून दूर आहे.जेवढा विकास व्हायला हवा तेवढा कांहीच विकास झालेला नाही....हे स्थळ महाराष्ट्र शासनाची सेवा, पुरातत्व खाते,वनखाते किंवा सामाजिक संघटनेची सेवे पासून वंचित आहे !


जय भवानी ! जयशिवराय !!

# तुम्हावर केली मी मर्जी बहाल...

**ज्योतिर्मय साहित्य**

पान जागे फूल जागे, भाव नयनी जागला, तुम्हावर केली मी मर्जी बहाल, चंद्र आहे साक्षीला, चंद्र आहे साक्षीला !

हे गाणे सुरमयी शाम या मराठी भक्तीगीते, चित्रपट गीते या कार्यक्रमात दीपलक्ष्मी सांस्कृतिक हॉल या ठिकाणी जून महिन्यात आम्ही सादर केले. ''चंद्र आहे साक्षीला'' या चित्रपटातील हे गाणे सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले आणि सुधीर फडके यांनी गायले आहे. सुधीर फडके यांनीच संगीत दिलेल्या या गाण्याचे बोल लिहिले आहेत ज्येष्ठ गीतकार जगदीश खेबुडकर यांनी. १९७८ साली चित्रपटात गायलेले व प्रसिद्धीस पावलेले हे गाणे आजही मराठी जनांच्याच नव्हे तर सर्वांच्याच मनात रुंजी घालतेय. सहजगत्या हे गाणे गुणगुणारे अनेकजण आपल्याला दिसतात. गाण्यात गीतकाराने चंद्र आणि चांदण्याच्या साक्षीने प्रेमाची भावना व्यक्त केली आहे. व्ही. शांताराम यांच्या पिंजरा या चित्रपटासाठी गीतकार जगदीश खेबूडकर यांनी जवळपास ११० गीते लिहिली. व्ही. शांताराम यांनी यातील १० च गीते निवडली. पिंजरा या चित्रपटातील गाण्यांनी लोकांच्या मनात घर केले आहे. जगदीश खेबूडकर काही वर्षापूर्वी साताऱ्याच्या ग्रंथमहोत्सवात मुलाखत व मनोगतासाठी आले होते. हॉटेल श्रीमान मध्ये त्यांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होतो. मला अजूनही आठवतेय रविवार होता आणि साताऱ्यातील बुध्दीवंत लोकांचा एक मेळावा हॉटेल श्रीमान च्या खालील हॉलमध्ये भरला होता. नक्की आठवत नाही तो कोणत्या संस्थेचा अथवा ग्रुपचा होता. बहुतेक पत्यामधील रम्मी अथवा ब्रीज हा खेळ ग्रुप ग्रुपने चालू होता. आपली बुद्धीमता आणि नशीबाने येणारे पत्ते याव्दारे सगळे आनंद घेत होते. मी जगदीश खेबूडकर यांना घेऊन सभास्थानी गेलो. कार्यक्रमांमध्ये आपल्या मनोगतात जगदीश खेबुडकर यांनी पत्ते खेळणाऱ्या सातारकर नागरीकांवर टीका केली. त्यांना असे वाटत होते कि, तेथे जुगारच चालू आहे. कार्यक्रम संपल्यानंतर मी त्यांची चूक, समज, गैरसमज दूर केला. सांगायची गोष्ट अशी कि काही कलावंत गीतकार, लेखक काही वेळा आपल्या कार्यात एवढे मग्न असतात कि, त्यांचे इतर बाबींकडे दुर्लक्ष होते. आणि त्यांचा गैरसमज होत असतो. पत्ते म्हणजे जुगारच अशी




त्यांची झालेली भ्रामक कल्पना अजून सुद्धा माझ्या मनात ठसली आहे. पण एखाद्या चित्रपटासाठी त्या चित्रपटाची कथा ऐकून आपली प्रतिभा पणाला लावून गीत तयार करणे ही सोपी गोष्ट नाही.

अभंगापासून लावणीपर्यंत, प्रेमगीतांपासून ते बालगीतांपर्यंत आणि शाहिरीपासून लोकगीतांपर्यंत सर्व प्रकार समर्थपणे हाताळलेले गीतकार जगदीश खेबूडकर यांना




आपण ते जाऊन बरीच वर्षे झाली तरी मराठी चित्रपटसृष्टीचे नाना म्हणूनच ओळखतो. त्यांच्या नावावर अडीच हजार गाणी, साडेतीन हजार कविता, पंचवीस पटकथा आणि संवाद, पन्नास लघुकथा, चार नाटके, चार दुरदर्शन मालिका, टेलिफिल्मस, मालिका गीते हे सारेकाही आणि अजूनही काही जमा आहे. वयाच्या एकोणऐंशी वर्षापर्यंत ते काम करीत होते. १० मे १९३२ साली जन्मलेल्य जगदीश खेबूडकर यांचे ३ मे २०११ रोजी अचानक निधन झाले. एका मुलाखतीत ते असे म्हणाले होते कि, ठरवून कवी होता येत नाही. कवीच्या नकळत कविता जन्माला येते आणि तीच सांगते कि, तू कवी झाला आहेस. आयुष्यात कधीही तमाशा न बघीतलेल्या खेबूडकरांनी एकापेक्षा एक अशा अप्रतिम लावण्या लिहिल्या. मोहित्यांची मंजुळा या भालजी पेंढारकर यांच्या सिनेमासाठी खेबूडकरांनी गाणी लिहिली. १९६३ साली भालजी पेंढारकर साधी माणसं या चित्रपटाची निर्मिती करीत असताना एका गाण्यापाशी येऊन त्यांची गाडी अडली. मग त्यांनी खेबूडकरांना फोन लावला तेव्हा ते शाळेत शिकवत होते. त्यांनी त्यांच्या ऑफ तासाला सायकलीवर टांग मारली आणि ते स्टुडिओत पोहोचले. भालजींनी पार्श्वभूमी सांगितली की, लोहारकाम करणार जोडप.पत्नीच पतीवर असणारं प्रेम. लोहारांचा देव त्यांला वाहिली जाणारी फुलं आणि गरीबीत असणारी पण श्रीमंतीचे समाधान हे सार ऐकतानाच 'ऐरणीच्या देवा तुला, ठिणगी ठिणगी वाह् दे' हे गाण जगदीश खेबूडकर यांनी ताबडतोब लिहून दिलं. एका मुलाखतीत खेबूडकर म्हणाले,.... होते कि, ग.दि.मा मला इतके आवडतात की, त्यांचे काव्यातील काना, मात्रा, अनुस्वार सुद्धा मला प्रिय आहे. ग. दि. माडगूळकर यांच्याच काळात किलकिलत्या दारातून कोवळ्या उन्हातून प्रवेश करून खेबूडकरांनी आपल्या प्रकाशाने रसिक मनांचा दिवाणखाना उजळून टाकला आहे. पिंजरा या सिनेमातल्या तुम्हावर केली मी मर्जी बहाल या लावणीविषयीची एक आठवण खेबूडकरांनी आपल्या मुलाखतीत सांगितली आहे. जवळपास पन्नास गाणी लिहूनही व्ही. शांताराम यांना लावणी पसंत पडत नव्हती ते म्हणाले की, असं गाणं पाहिजे की समोरचा माणूस खेचला गेला पाहिजे. जगदीश खेबूडकर यांना घरी रात्री हे गाणं सुचलं आणि त्यांनी फोन करून हे गाणं व्ही. शांताराम यांना ऐकविले. संगीतकार राम कदम हे खेबूडकरांच्या खोलीतच होते. राम कदम यांनी दिलेली पहिली चालच अंतिम करण्यात आली. आणि हे अवर्णनीय गाणं लावणी स्वरूपात आपल्या सर्वांसमोर आले. पेशाने शिक्षक असणारे खेबूडकर यांचे आयुष्य म्हणजे साधी राहणी आणि उच्च विचारसरणी असे होते. ग्रंथावर त्यांचे प्रचंड प्रेम होते. जवळजवळ दहा हजार ग्रंथांचा ग्रंथसंग्रह त्यांच्याकडे होता. महाराष्ट्राच्या इतिहासात कायम राहील अशी साहित्याची सेवा त्यांच्या हातून झाली आहे. ते म्हणायचे, माझी गाणी म्हणणारी मराठी भोळी माणसं हीच माझी संपत्ती आहे.

दीपलक्ष्मी सांस्कृतिक हॉलमध्ये जून महिन्यात हिंदी कराओके गाण्यांबरोबरच चार मराठी गाण्यांचे कार्यक्रम झाले. प्रत्येक महिन्यात ४-५ तरी मराठी गीताचे कार्यक्रम त्याठिकाणी होतील आणि या गाण्यांमधून मराठी वाचन संस्कृतीकडे वाचण्याचा ओघ सर्वांचा वाढेल याची मला खात्री आहे.




## आनंद देणारा पाऊस

**ज्योतिर्मय साहित्य**

ऋतुचक्राच्या सृष्टीत आनंद उत्सव सुरू होतो तो वर्षा-ऋतूच्या आगमनाने. जीवघेण्या उन्हाचे तडाखे खाऊन डोंगर-दऱ्या, नदी-नाले, विहिरी कोरडेठाक झालेले पाहून तहानलेले जीव अधिकच घाबरून जाऊ लागतात.

महानगरवासीयांना पाणी पुरवठा करणारी धरणे, जलाशय यांच्यातील पाणीसाठा वाढत्या उन्हाळ्यात कमी कमी होताना पाहून म्हणजे सर्वांच्या तोंडचे पाणी पळते.

जून महिना म्हटले की, पावसाळा आलाच.

०७ जून मृग नक्षत्र ''हे न चुकणारे गणित लहानपणापासून आपण पाहत आहोत.

आषाढास्य प्रथम दिवसे'' अर्थात महाकवी कालिदास जयंती या दिवशी कवी कालिदास रचित ''मेघदूत''या महाकाव्याची आठवण होतेच होते.

मित्र हो-

आकाशात काळ्या मेघांची गर्दी होऊ लागते, आभाळ दाटून येते, आणि चराचर सृष्टी आतुरल्या मनाने, आकाशाकडे डोळे लावून बसलेली असतांना, टपटप टपोरे

थेंब पडू लागतात, आणि पावसाच्या धारा, पावसाच्या सरी कोसळू लागतात, जमिनीवर पावसाचे थेंब पडताच तो परिचित मृदगंध'' आसमंती दरवळू लागतो.

जगातले सगळे सुगन्ध या ''मातीच्या सुवासापुढे ''फिके वाटू लागतात.

दरवर्षी येणारा असा पहिला पाऊस'' मोठा आनंद देणारा असतो. गावाकडे शेती करणाऱ्या शेतकरीदादाचा कोमेजून गेलेला, हिरमुसलेला, चेहेरा आता आनंदाने फुलून येतो. पाऊस आणि शेतकरी, शेत-शिवार ''हे नाते जीवाभावाचे आहे.

मित्र हो-

कवी-मन आणि कविता यांना पावसाचे अतीव आकर्षण असणे जणू निसर्गदत्त भावना आहे.

पावसाच्या आगमनाने कवी मनात काव्यांकुर रुजतात, बीज खोलवर फुलू लागते आणि सुंदर पाऊस कविता उगवते, उमलते. रसिक मनांना आनंद देणारा हा पाऊस कवींचा प्रिय मित्र आहे.

माझ्या काव्यसंग्रहात ही या आनंद-पावसाच्या अनेक मनोरम, सुखद , भावुक, हळव्या कविता आहेत. तशाच बाल-मित्रांसाठीही ''छान छान पाऊस कविता ''आहेत.

काही पाऊस कवितांचे काव्य-अंश खालील प्रमाणे :

१.
मनभावन पावसासोबत येतात
प्रसन्न अशा पाऊससरी
पाउस सरी मना मनाला
प्रसन्न करून टाकणाऱ्या
(पाऊस सरी, गाणे दिवाणे-२००३),

२.
अंगणी पाऊस कोसळला
बघ तळे साचले
त्यात फुलें पडता
नक्षी सुंदर खुले..
(आरस्पानी रूप, गाणे दिवाणे-२००३),

३.
रेंगाळती थेंब केसांवरी
फुले होऊनी थबकती
काही ओघळती डोळ्यांवरती
शिंपल्यातले मोती होती..
(पाऊस थेंब, मन डोह-२०११),

४.
सरसर धुंद सरीखाली
भिजलो मी, भिजलीस तू ही
खळखळून हसला मग तो
मोठा अवखळ पाऊस तो..
(मोठा अवखळ पाऊस तो, मन डोह..२०११),

५.
कोंब प्रीतीचे मनात
फुलले या पावसात
आनंदाच्या झुल्यामध्ये
झुलावे मस्त पावसात..
(मस्त पावसात, मला कवीचा चष्मा लागला-२०२५),

काही बालकविता:

१.
पावसाच्या धारा
येती झरा झरा
आनंदाच्या सरी
ऋतू पावसाळा
(ऋतू पावसाळा, मस्त फिरू रे मस्त फिरू- २०२७),

२.
पाऊस जादू करतो
दुष्काळ संपवतो
साऱ्या चराचराला
जीवदान देतो..
(पावसाची जादू, मस्त फिरु रे मस्त फिरू-२०१७),

३.
काळे ढग आकाशी जमती
लख लख विजा चमकती
मने आनंदाने भरून येती
पावसाचे गाणे म्हणती..
(पावसाचे गाणे..-२०२४

पावसाची अशी आनंददायी भेट कशी वाटली, जरूर कळवा.

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559